सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

RNI. NO. MAHBIL /25/A0192

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३३६ | शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १,५६,५००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १,४५,५००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ १,२१,०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २,४५०/-
भाव प्रती १० ग्राम




**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!
जय स्वदेशी...!!

**'चौका-बर्तन ही तो करना है, पढ़-लिखकर क्या करोगी',**
**जिसे मिलते थे ताने, वही लड़की बनी 'आयएएस'**

पान ३ वर...

# श्री मंगळग्रह मंदिरात आजपासून रंगणार अमळनेरच्या लेकींचा कौतुक सोहळा

## माहेरच्या अंगणात मिळणार बालपणीच्या आठवणींची अनुभूती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : माहेरच्या अंगणातील बालपणीच्या आठवणींना उजाळा देत, सासर-माहेर दोन्ही कुटुंबांना आपल्या कर्तृत्वाने आणि मायेने समृद्ध करणाऱ्या अमळनेरच्या लेकींचा आगळावेगळा कौतुक सोहळा 'माहेरचा पारिजात' या उपक्रमातून आयोजित करण्यात आला आहे. अमळनेर महिला मंच ट्रस्टच्या वतीने हा विशेष स्नेहमेळा शनिवार, दि. २९ ऑगस्ट ते सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ दरम्यान येथील श्री मंगळग्रह मंदिरात रंगणार आहे. त्यासाठी मंगळग्रह सेवा संस्थेचे विशेष सहकारी लाभले आहे.

पारिजातकाच्या फुलांचा सडा जसा अवघे अंगण सुगंधित करतो त्याचप्रमाणे माहेरची लेकी आपल्या अस्तित्वातून, कर्तृत्वातून आणि मायेतून सासर-माहेर दोन्ही घरे उजळून टाकतात. याच भावनेतून 'माहेरचा पारिजात' या उपक्रमाची संकल्पना साकारण्यात आली आहे. माहेरच्या अंगणात पुनश्च बालपण अनुभवता यावे, जुन्या आठवणींना उजाळा मिळावा आणि मैत्रिणींसोबत मनमोकळेपणाने गप्पांची मैफल रंगावी, हा या स्नेहमेळ्यामागील प्रमुख उद्देश आहे.

या स्नेहमेळ्यात भाषण, कविता, गाणी, नृत्य, विनोद, पारंपरिक खेळ, उखाणे, मंगळागौरीचे खेळ यांसह विविध मनोरंजक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री मंगळग्रह मंदिर परिसरातील हिरवाईने नटलेल्या प्रसन्न आणि मंगलमय वातावरणात हा सोहळा आनंद, उत्साह आणि भावनिक आठवणींनी रंगणार आहे.

या उपक्रमासाठीची नोंदणी आता पूर्णत्वास आली आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्षा सौ. कांचनताई शहा, उपाध्यक्षा सौ. तिलोत्तमाताई पाटील व सौ. सरोजताई भांडारकर, सचिव सौ. वसुंधराताई लांडगे, खजिनदार प्रा. सौ. शीलाताई पाटील यांच्यासह महिला मंचच्या कार्यकारी मंडळातील सदस्या आणि मंगळग्रह सेवा संस्थेचे सर्व विश्वस्त व सेवेकरी परिश्रम घेत आहेत. 'माहेरच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी आणि माहेरच्या लेकींचा सन्मान अनुभवण्यासाठी सर्व माहेरवाशिणींनी आवर्जून वेळेत उपस्थिती द्यावी, असे आवाहन अमळनेर महिला मंच ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

**स्नेहमेळ्यात आज (शनिवार, दि. २९ ऑगस्ट) होणारे कार्यक्रम**

सकाळी ९.०० वाजता माहेरवाशिणींचे स्वागत, हळद-कुंकू लावून औक्षण, गजरे वाटप, ढोल-ताशांच्या गजरात श्री मंगळग्रह देवांची सामूहिक आरती. ९.३० वाजता अल्पोपहार, सर्व माहेरवाशिणींनी हाता-पायाला मेंदी लावणे तसेच हातात बांगड्या भरणे. याचवेळी प्रत्येकीने स्वयंपरिचय देणे. दुपारी १२.१५ वाजता सामूहिक अभिषेक. १.१० वाजता सामूहिक भोजन. २.०० ते ३.०० या वेळेत विविध बैठे खेळ. सायंकाळी ५.३० वाजता सामूहिक चहापान. ५.५५ वाजता श्री मंगळग्रह देवांची सामूहिक आरती. ७.३० वाजता दीपप्रज्वलन, माहेरवाशिणींचा सन्मान, मंगळागौर आदी. रात्री ९.३० वाजता रात्रीचे भोजन तसेच विविध खेळ खेळणे.

# धुळे, जळगावच्या दोन तरुणांना बिहारमध्ये रेल्वे ट्रॅकवर अटक

## दहा लाखांत तीन महिने प्रशिक्षणानंतर केले बनावट 'ट्रॅकमन'

### रेल्वेत नोकरीचे आमिष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : बिहारमधील नरकटियागंज-मुझफ्फरपूर रेल्वेमार्गावरील मुशहरवा हॉल्टजवळ बनावट रेल्वे ट्रॅकमन म्हणून फिरणाऱ्या महाराष्ट्रातील (जळगाव व धुळे) कुणाल आनंद (वय २१) आणि दिनेश बारकू धनगर (वय २३) या दोन तरुणांविरुद्ध नरकटियागंज रेल्वे पोलिस ठाण्यात बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यांचा साथीदार आदित्य महादू पाटील हा मात्र फरार आहे. दरम्यान, दिनेश धनगर व आदित्य पाटील हे अमळनेर तालुक्यातील रहिवासी असल्याचे सांगण्यात येत आहे.

रेल्वे पोलिस ठाण्याचे प्रभारी दिनेश कुमार साहू यांनी दिलेल्या माहितीनुसार नोकरीचे आमिष दाखवून तरुणांकडून लाखो रुपये उकळणारे हे रॅकेट अनेक राज्यांत पसरले असल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. या प्रकरणातील संपूर्ण टोळीचा लवकरच पर्दाफाश केला जाईल, असे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, सदर रॅकेटमधील काही जण जळगाव जिल्ह्यातील अमळनेर तसेच धुळे जिल्ह्यातील असल्याची चर्चा आहे.

**प्रत्येकी दहा लाख रुपये घेतल्याचा आरोप**

पोलिसांत नोंदविण्यात आलेल्या तक्रारीनुसार समस्तीपूर येथील शैलेंद्र सिंह याने 'स्पेशल स्पोर्टस् कोटा'तून ट्रॅकमन पदावर भरती करून देण्याचे आमिष दाखवत संबंधित दोन्ही तरुणांकडून प्रत्येकी दहा लाख रुपये घेतले. महाराष्ट्रातील राजू पाटील याच्या माध्यमातून शैलेंद्र सिंह याला पैसे देण्यात आल्याचे चौकशीत समोर आले आहे. त्यानंतर समस्तीपूर विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयाच्या नावाने त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. नियुक्तीपत्र मिळाल्यानंतर आरा रेल्वेस्थानकाजवळ त्यांना तब्बल तीन महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर नियुक्तीपत्र परत घेण्यात आले आहे.




*अमळनेर : बिहारमधील नरकटियागंज-मुझफ्फरपूर रेल्वेमार्गावरील मुशहरवा हॉल्टजवळ मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ च्या सकाळपासून बनावट रेल्वे ट्रॅकमन म्हणून संशयितरित्या फिरताना आढळल्याने 'आरपीएफ'च्या जवानांनी ताब्यात घेतलेले कुणाल आनंद व दिनेश धनगर.*

**प्रशिक्षणात २२ जणांचा सहभाग**

विशेष म्हणजे या दोघांसह तब्बल २२ तरुणांना प्रशिक्षण देण्यात आले होते, अशी माहिती चौकशीत समोर आली आहे. त्यामुळे या बनावट भरती प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ च्या सकाळपासून कुणाल, दिनेश आणि आदित्य हे तिघेही मुशहरवा हॉल्टजवळ रेल्वे ट्रॅकवर फिरत होते. त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने रेल्वेमॅन शिवपूजन साह यांनी बेतिया येथील पीडब्ल्यूआय अवधेश कुमार यांना ही माहिती दिली. त्यानंतर 'आरपीएफ'च्या जवानांनी ही कारवाई केली. यावेळी दोघांना पकडण्यात त्यांना यश आले, तर आदित्य पाटील फरार झाला. अटक करण्यात आलेल्या दोघांच्या हातात हातोडा, हिरव्या रंगाचा झेंडा आणि बांबूची पट्टी आढळली. त्यांच्या अंगझडतीत 'मिनिस्ट्री ऑफ रेल्वे, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया'च्या नावाचे ओळखपत्रही मिळाले. फरार आदित्यचा शोध सुरू असून, या प्रकरणामागील संपूर्ण टोळीचा तपास रेल्वे पोलिसांकडून सुरू आहे.

# शिक्षकाच्या घरातून पावणे चौदा लाखांचे दागिने लंपास

## सात्रीतील घटना; घरातून चावी चोरून केला प्रताप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील सात्री येथे अज्ञात व्यक्तीने घरातील कपाटाची चावी चोरून घरातील व्यक्तींच्या अपरोक्ष शिक्षकाच्या घरातील तेरा लाख ७८ हजार ७५८ रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. ही घटना दि. २ ऑगस्ट ते दि. २६ ऑगस्ट २०२६ दरम्यान घडली.

राकेश सुभाष बोरसे (रा. सात्री) हे अमळगाव येथे शिक्षक आहेत. दि. २ ऑगस्ट रोजी त्यांची आई पुण्यातील लहान भावाकडे गेली असताना त्यांनी घराच्या कपाटाच्या तिजोरीची चावी गादीखाली ठेवलेली होती. दि. १७ ऑगस्ट रोजी त्यांची आई पुण्याहून घरी परतली. त्यानंतर दि. १८ ऑगस्ट रोजी राकेश जळगावला जाण्यासाठी निघाले तेव्हा कपाटातील पाकीट काढायला गेला असता गादीखाली ठेवलेली चावी सापडली नाही. शोधाशोध केल्यानंतरही चावी न सापडल्याने राकेश यांनी दि. २४ ऑगस्ट रोजी चावी बनविणारा कारागीर आणून कपाट उघडले. त्यावेळी तिजोरीतील सोन्याच्या दागिन्यांचे बॉक्स जसेच्या तसे होते. दि. २६ ऑगस्ट रोजी राकेश हे बहिणीकडे जाणार म्हणून त्यांनी आईकडे अंगठी, चेन मागितली असता कपाटात ठेवलेल्या एकाही बॉक्समध्ये काहीही आढळून आले नाही. सर्व दागिने चोरीस गेलेले दिसून आले. त्यात कपाटातील दोन लाख ५७ हजार रुपये किमतीची १५.७८० ग्रॅम वजनाची सोनसाखळी, सहा लाख ४४ हजार ८९९ रुपये किमतीची ३८.६७० ग्रॅम वजनाची गळ्यातील माळ, एक लाख ९३ हजार १२० रुपये किमतीचे ११.५८० ग्रॅम वजनाचे पेंडल, ७९ हजार ५९९ रुपये किमतीची ५.०३० ग्रॅम वजनाची अंगठी, एक लाख ५२ हजार ३९७ रुपये किमतीची ११.८०० ग्रॅम वजनाचा नेकलेस, २१ हजार ३६८ रुपये किमतीचे १.५८० ग्रॅम वजनाची कानातील बाळी, २७ हजार ३१९ रुपये किमतीची २.०२० ग्रॅम वजनाची अंगठी व रोख २७०० रुपये असलेले एटीएम कार्डसह पाकीट असा एकूण तेरा लाख ७८ हजार ७५८ रुपयांचा ऐवज चोरट्याने चोरून नेल्याचे उघडकीस आले. राकेश यांच्या फिर्यादीवरून मारवड पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहिता कलम ३०५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सहाय्यक पोलीस निरीक्षक साजिद मन्सुरी, पोलीस उपनिरीक्षक विनोद पवार यांनी घटनास्थळी पंचनामा केला.

एका महिन्यात घरात लोक असताना चावी केव्हा चोरीस गेली आणि दागिन्यांची चोरी केव्हा झाली हे समजायला कठीण असल्याने पोलिसांसमोर चोरी शोधणे मोठे आव्हान आहे. पोलीस सर्व दिशांनी संशयाची सुई फिरवून चाचपणी करीत आहेत.



*अमळनेर : येथील कंत्राटदार विजय शिवाजीराव पाटील यांना वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देत शुभेच्छा देताना दै. 'ग्लोबल महातेज'चे मार्केटिंग मॅनेजर शरद कुलकर्णी, ब्युरो चीफ रजनीकांत पाटील, मुख्य आर्टिस्ट समीर सांगळे. शेजारी विजय पाटील यांचे वडील शिवाजीराव पाटील व आई सौ. मंगलाताई पाटील.*

(छायाचित्र : अजय पाटील)

# अमळनेरची सुकन्या अमृता खेळणार अंडर-१५ क्रिकेट वर्ल्डकप

## भारतीय संघात एकमेव निवड; दक्षिण आफ्रिकेत २१ सप्टेंबरपासून स्पर्धा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील आर. के. पटेल परिवारातील सुकन्या दियाना ऊर्फ अमृता मितेश पाटील हिची अंडर-१५ इनडोअर क्रिकेट वर्ल्डकपसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. महाराष्ट्रातून भारतीय संघात निवड झालेली ती एकमेव खेळाडू आहे. दक्षिण आफ्रिकेत दि. २१ सप्टेंबर २०२६ पासून ही स्पर्धा रंगणार आहे. अमृता ही मुंदडा ग्लोबल स्कूलमध्ये इयत्ता आठवीत शिक्षण घेत आहे. अमृता ही स्व. आर. के. दादा पाटील यांची पणती, उद्योजक विनोदभैया पाटील व वसंत बापू पाटील यांची नात, तर मितेश व मोनाली पाटील यांची सुकन्या आहे.

गेल्या तीन वर्षांपासून क्रिकेटचा सराव करणाऱ्या अमृताने जळगावात झालेल्या राज्यस्तरीय अंडर-१५ स्पर्धेत यष्टीरक्षण व फलंदाजीत दमदार कामगिरी केली. या कामगिरीच्या जोरावर तिची भारतीय संघात निवड झाली. यापूर्वी धुळे येथे झालेल्या अंडर-१९ बॉईज क्रिकेट सीरिजमध्ये तिने 'मॅन ऑफ द सिरीज'चा बहुमान मिळविला आहे. प्रशिक्षक मिलिंद शिंदे व रोनक शेख यांचे तिला मार्गदर्शन लाभत आहे. वर्ल्डकपच्या तयारीसाठी ती दि. १० सप्टेंबरपासून बेंगळुरू येथे सराव करणार असून, त्यानंतर दक्षिण आफ्रिकेत रवाना होणार आहे. अमृताच्या निवडीबद्दल उपमुख्यमंत्री ना. श्रीमती सुनेत्राताई पवार, मंत्री ना. राधाकृष्ण विखे-पाटील, खासदार श्रीमती स्मिताताई वाघ, आमदार अनिलदादा पाटील आणि मुंदडा ग्लोबल स्कूलचे चेअरमन ओमप्रकाश मुंदडा यांनी अभिनंदन केले आहे. तिच्या निवडीमुळे अमळनेरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.



## संपादकीय

### आवाज 'थांबव' डीजे...

गणेशोत्सवाला काही दिवसांचा अवधी असताना राज्यातील प्रमुख शहरांमध्ये पुन्हा ध्वनिवर्धकांच्या अतिरेकामुळे नागरिकांना होणारा त्रास आणि 'निर्बंधमुक्त उत्सवा'चा अट्टाहास यांचा झगडा ऐरणीवर आला आहे. मुंबईत उंच गणेशमूर्ती कोसळून दुर्घटना घडली; तर पुण्यात महापौरांच्या बैठकीत कार्यकर्ते आक्रमक झाले. 'डीजे' नावाच्या कानठळ्या बसवणाऱ्या यंत्रणेमुळे होणाऱ्या त्रासाचे अनुभव पुण्या-मुंबईपासून कोल्हापूर-नागपुरापर्यंत ठिकठिकाणचे नागरिक पूर्वीपासून सोसत आहेत; उत्तर प्रदेशात याच आवाजामुळे इमारती थरथरत असल्याचे ताजे दृश्य नागरिकांनी पाहिलेच असेल. पुण्यात पोलिसांनी सुरू केलेल्या कक्षाकडे गेल्या आठ महिन्यांत ध्वनिप्रदूषणाच्या तब्बल १४ हजार तक्रारी आल्या, त्यावरून हे प्रकार एखाद्या उत्सवापुरते मर्यादित राहिले नसून, वर्षभराचा त्रास झाल्याचे स्पष्ट झाले आहे. आता तरी राज्यकर्त्यांनी लोकानुनयी भूमिका सोडावी आणि नागरिकांच्याही आरोग्याची दखल घेऊन कार्यकर्त्यांचा उत्साह व नागरिकांची मानसिकता यांचा सुवर्णमध्य साधावा, ही अपेक्षा आहे.

सार्वजनिक गणेशोत्सवाला सरकारने नुकताच 'राज्योत्सवा'चा दर्जा दिला. त्यापूर्वीही गणेशोत्सव उत्साहात साजरा होत होताच; पण त्या निमित्ताने राज्यकर्त्यांनी 'निर्बंधमुक्त उत्सवा'ची घोषणा दिली आणि विविध घटकांमधून त्याचा सोयिस्कर अर्थ काढण्यास सुरुवात झाली. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे 'डीजे' नामक छोटेखानी यंत्रणेची नागरिकांच्या कानांचे पडदे फाडून टाकण्याची भीतीदायक क्षमता सर्वांनीच अनुभवली आहे. कोल्हापुरात आणि पुण्याच्या उपनगरात या आवाजाने कोणाला प्राण गमवावे लागले, तर वृद्ध, रुग्ण, गर्भवती महिला आणि सर्वसामान्यांना कायमचा बहिरेपणा-हृदयविकार असे शेकडो अनुभव लक्षात घेऊन सोलापुरात जाणत्यांनी मिरवणुकीत 'डीजे'वरच बंदी आणली, मग तेच सत्ताधारी असताना पुण्यात तो पुढाकार का घेतला जात नाही? बरे, हे ध्वनिवर्धक मर्यादेत असते, तर नागरिकांनी विरोध केलाही नसता. पण, ६० ते ८५ डेसिबलपर्यंत गोंगाटाची मानवी कानांची क्षमता असताना 'डीजे'चे आवाज सगळ्या मर्यादा धाब्यावर बसवून सव्वाशे ते दीडशे डेसिबलपर्यंत पोहोचू लागले. ज्याचा आवाज जास्त; त्याची म्हणे परिसरात 'हवा' निर्माण होते; त्यातूनच 'आवाज वाढव डीजे'ची स्पर्धा लागते, असे त्यामागील वर्चस्वाचे अजब मानसशास्त्र. 'एखाद्याने 'डीजेमुक्ती'चे आवाहन केले, म्हणून 'मी अधिक जोरात 'डीजे' वाजविणार,' अशा मानसिकतेमधून आपण सर्वांचेच आरोग्य धोक्यात आणत आहोत, याचे भान विस्मृतीत जात आहे. पुण्यातील बैठकीत कार्यकर्त्यांच्या संघटित आक्रमकपणामुळे तक्रार करणाऱ्या नागरिकालाच बाहेर काढले गेले आणि 'लोकनेते' म्हणवून घेणारेही निमूटपणे बसून राहिले; मग सामान्यांनी दाद मागावी कुठे, असा प्रश्न पडल्यास नवल नाही. 'अन्य उत्सवांमध्ये कारवाई का होत नाही,' या युक्तिवादात तथ्य आहेच. ध्वनिप्रदूषणाचा त्रास जात-धर्मापलीकडे सगळ्याच समाजाला होतो, त्यामुळे वर्षभर हे उल्लंघन रोखण्याची जबाबदारी पोलिसांना टाळता येणार नाही.

पुण्यात ध्वनिक्षेपकांबाबतचा निर्णय पोलिस आयुक्तांवर सोपवण्यात आला; मात्र सर्वोच्च न्यायालयाने ठरवलेल्या वेळ आणि ध्वनिमर्यादेच्या निकषांमध्ये सूट-सवलती देण्याचा अधिकार आयुक्त किंवा सरकारला तरी आहे का? गणेशोत्सवात उत्साहाने सहभागी होणारे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुंडागर्दी आणि ध्वनिप्रदूषणामुळे नवरात्रीतील तोरण मिरवणुकांवर बंदी घातली आणि पुणेकरांनीही त्यांना दुवा दिली, याची आठवण ताजी आहे. हे नियम म्हणजे उत्सवातील कार्यकर्त्यांवरचा अन्याय नाही, तर सर्वसामान्यांच्या आरोग्याचा विचार करून आखलेली चौकट आहे, हे कार्यकर्त्यांना पटवून देण्याची जबाबदारी राजकीय आणि गणेशोत्सवातील नेत्यांचीही आहे. त्यासाठी कार्यकर्त्यांनाही विश्वासात घ्यावे लागेल. हा साऱ्या समाजाचा उत्सव असल्याने संयमाचा सल्ला देणाऱ्या सर्वांनाच 'उत्सवविरोधी' ठरवून बाद करणेही योग्य नाही. अशा कंठाळी 'इव्हेंटीकरणा'तून निवडक मंडळींचा 'संघटना'चा हेतू साध्य होईलही; पण 'प्रबोधना'चा उद्देश मागे पडून चालणार नाही.

# ईद-ए-मिलादुन्नबीनिमित्त रुग्ण, रेल्वे प्रवाशांना फळांचे वाटप

## 'राष्ट्रवादी'च्या अल्पसंख्याक विभागाने राबविला सामाजिक उपक्रम



अमळनेर : ईद-ए-मिलादुन्नबीच्या पवित्र पर्वानिमित्त येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्याक विभागातर्फे शहरात सामाजिक उपक्रमांतर्गत ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळांचे वाटप करताना अल्पसंख्याक विभागाचे शहराध्यक्ष सय्यद अजहर अली, सरचिटणीस जुनेद शेख आणि कार्याध्यक्ष बबलू शेख यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन राजपूत, जितेंद्र ठाकूर, माजी शहराध्यक्ष मुख्तार खाटीक, अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष अलीम मुजावर, जिल्हा उपाध्यक्ष आरिफ भाया, वसीम पठाण, भूषण भदाणे, सय्यद नबी, दर्शन पाटील, रिजवान मणियार, आसिफ सय्यद, सलमान बागवान, जावेद शेख, शरूख खान आदी.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : ईद-ए-मिलादुन्नबीच्या पवित्र पर्वानिमित्त येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्याक विभागातर्फे शहरात सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. तसेच ग्रामीण रुग्णालयातील रुग्ण तसेच रेल्वेस्थानकावरील गरजू आणि प्रवाशांना फळांचे वाटप करण्यात आले. प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांनी दिलेल्या प्रेम, करुणा आणि मानवसेवेच्या संदेशातून प्रेरणा घेत हा उपक्रम राबविण्यात आला. सणाचा आनंद साजरा करताना गरजू घटकांप्रती संवेदनशीलता जपण्यासोबतच सर्वधर्म समभाव, बंधुभाव आणि माणुसकीचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

अल्पसंख्याक विभागाचे शहराध्यक्ष सय्यद अजहर अली, सरचिटणीस जुनेद शेख आणि कार्याध्यक्ष बबलू शेख यांच्या आयोजनातून हा उपक्रम पार पडला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन राजपूत, जितेंद्र ठाकूर, माजी शहराध्यक्ष मुख्तार खाटीक, अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष अलीम मुजावर, जिल्हा उपाध्यक्ष आरिफ भाया, वसीम पठाण, भूषण भदाणे, सय्यद नबी, दर्शन पाटील, रिजवान मणियार, आसिफ सय्यद, सलमान बागवान, जावेद शेख, शरूख खान यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमळनेरमध्ये घरफोड्यांची मालिका

## हिरकणीनगरात बंद घर फोडून दहा हजारांचा ऐवज लंपास




अमळनेर : येथील ढेकू रस्त्यावरील हिरकणीनगर परिसरात दि. २२ ते २६ ऑगस्ट दरम्यान बंद घर फोडून चोरट्यांनी सुमारे दहा हजार रुपयांचा ऐवज लंपास केला.

> चोर स्थानिक नव्हे, तर बाहेरगावाचे असावेत. सध्या पाच-सात जण टोळीने येऊन घरफोड्या करीत आहेत. त्यासाठी ते दिवसा रेकी करत असावेत. मात्र, गुन्हे दाखल असो अथवा नसो चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पथक रवाना केले असून तांत्रिक यंत्रणेची मदतही घेतली जात आहे.
>
> **– दत्तात्रय निकम, पोलीस निरीक्षक, अमळनेर**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील ढेकू रस्त्यावरील हिरकणीनगर परिसरात बंद घर फोडून चोरट्यांनी सुमारे दहा हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना दि. २२ ते २६ ऑगस्टदरम्यान घडली. दरम्यान, याच कालावधीत अमळनेर शहरात तीन ते चार ठिकाणी घरफोडीचे प्रयत्न झाल्याची माहिती समोर आली आहे. काही नागरिकांनी किरकोळ चोरी झाल्याने पोलिसांत तक्रार देण्यास असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे शहरात चोरट्यांची टोळी सक्रिय असल्याची शक्यता व्यक्त होत आहे.

ढेकू रस्त्यावरील हिरकणीनगरमधील प्लॉट क्र. १४ चे मालक विलास पाटील हे दि. २२ ते २६ ऑगस्टदरम्यान बाहेरगावी गेले होते. घर बंद असल्याची संधी साधून चोरट्यांनी इंटरलॉकिंग सिस्टीम तोडून घरात प्रवेश केला. घरातील सुमारे दहा हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. विलास पाटील यांचे पुतणे महेंद्र पाटील यांनी पोलिसांना माहिती दिल्यानंतर भारतीय न्यायसंहिता कलम ३३१(३), ३३१(४) आणि ३०५(अ) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

दरम्यान, अमळनेर शहरात चोरट्यांनी तीन ते चार घरे फोडण्याचा प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे. एका घरातून चोरट्यांनी केवळ कुलूप नेले, तर निलंबित तहसीलदार रूपेशकुमार सुराणा यांच्या बंद घराचेही कुलूप तोडून चांदीच्या समया आणि रोख रकमेसह सुमारे ३० ते ४० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचे समोर आले आहे. काही ठिकाणी किरकोळ रकमेची चोरी झाल्याने संबंधितांनी पोलिसांत फिर्याद दिलेली नाही. शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे नेटवर्क पोलिसांच्या तपासासाठी महत्त्वाचे ठरत असून, चोरट्यांच्या हालचाली त्यामध्ये टिपल्या गेल्याची माहिती आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांकडून चोरट्यांचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# कुस्ती मल्लविद्या महासंघाच्या अमळनेर तालुकाध्यक्षपदी प्रताप शिंपींची निवड



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : कुस्ती मल्लविद्या महासंघाच्या अमळनेर तालुकाध्यक्षपदी प्रताप अशोक शिंपी (आबा) यांची निवड करण्यात आली आहे. सामाजिक, क्रीडा आणि संघटनात्मक क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत महासंघाने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविली आहे. त्यांच्या निवडीचे अमळनेर तालुक्यातील कुस्तीप्रेमी, मल्ल तसेच क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांकडून स्वागत होत आहे.

श्री. शिंपी हे अमळनेर शहरातील सामाजिक व क्रीडा क्षेत्रात सक्रिय व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित आहेत. त्यांनी नगरसेवक म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे. तसेच जय हिंद व्यायामशाळेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना त्यांनी व्यायाम आणि कुस्ती क्षेत्राला चालना देण्यासाठी योगदान दिले आहे. याशिवाय राजे शिवाजी मित्रमंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी विविध सामाजिक, सांस्कृतिक व सार्वजनिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. संघटन कौशल्य आणि क्रीडा क्षेत्रातील अनुभवाच्या जोरावर तालुक्यातील कुस्तीला अधिक व्यापक व्यासपीठ मिळवून देण्याचे आव्हान आता त्यांच्यासमोर आहे. कुस्ती हा महाराष्ट्राच्या मातीत रुजलेला पारंपरिक क्रीडा प्रकार आहे. तालुक्यातील व्यायामशाळा व आखाड्यांना प्रोत्साहन देणे, कुस्ती स्पर्धांचे आयोजन करणे आणि नवोदित मल्लांना संधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे पै. शिंपी यांनी सांगितले. त्यांच्या निवडीबद्दल कुस्तीप्रेमी, मल्ल, प्रशिक्षक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# टाकरखेड्याच्या सीतारामने घेतला पार्वतीच्या कुटुंबीयांचा बळी

## आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील टाकरखेडा येथील एकाच कुटुंबातील चौघांनी गुरुवार, दि. २७ ऑगस्ट रोजी पहाटे रेल्वेखाली आत्महत्या केली. याबाबत सीताराम ऊर्फ गटलू तानकू भिल याच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुनीलची बहीण सरलाबाईने फिर्याद दिली, की बुधवार, दि. २६ ऑगस्ट रोजी सुनीलचा तिचा मुलगा रामकृष्ण यास फोन आला. फोनवर सुनील रडत-रडत सांगत होता, की गावातील सीताराम सांगतो, की माझे तुझी पत्नी पार्वतीशी गैरसंबंध आहेत. त्यात तू जर आडवा आला तर तुला आणि मुलांना मारून टाकेल. त्यानंतर तो दि. २६ ऑगस्ट रोजी धमकी देऊन गेला, की तुला पटत नसेल तर तू मरून जा. यामुळे सुनील, पार्वती यांनी त्यांच्या मुलांसह जीवन संपविले.

दरम्यान, मृत्यूपूर्वी सुनीलने माझ्या खिशात लाल डायरी असून त्यात पार्वतीच्या आई-वडिलांचे फोन नंबर आहेत. खाली भावांचे नंबर आहेत. त्यांना कळवून द्या. माझी पत्नी तशी नाही. तुम्ही आमचा घात केला, असा व्हिडिओही व्हायरल केला. याबाबत पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना संशय आल्याने त्यांनी आधीच सीतारामला ताब्यात घेऊन ठेवले होते. नंतर त्याच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल होताच त्याला अटक करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक तपास गणेश अहिरे पुढील तपास करीत आहेत.

# चार दिवसांपासून रखडलेली ज्वारी खरेदी अखेर सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या चार दिवसांपासून रखडलेली ज्वारी खरेदी अखेर सुरू करण्यात आल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. मात्र, मोजक्या ८०० क्विंटलची खरेदी शिल्लक असल्याने अजूनही अनेक शेतकरी वंचित राहणार असल्याने उद्दिष्ट वाढवून देण्याची मागणी होत आहे.

मार्केटिंग फेडरेशनतर्फे शासकीय ज्वारी व मका खरेदीला अमळनेर तालुका फ्रुटसेल सोसायटीला परवानगी देण्यात आली आहे. सुमारे तेराशे शेतकऱ्यांनी ज्वारीसाठी नोंदणी केली आहे. ज्वारीला तीन हजार ७०० रुपये प्रतिक्विंटल भाव देण्यात आल्याने शेतकऱ्यांना बाजार भावापेक्षा अधिक भाव मिळणार आहे. आतापर्यंत ४८५ शेतकऱ्यांची ज्वारी खरेदी झाली आहे. अखेरच्या दिवसापर्यंत २१ हजार क्विंटल ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण होणार असून फक्त एक ते दोन दिवसांत उद्दिष्ट पूर्ण होणार आहे.

शेतकऱ्यांच्या नोंदणीत घोटाळा झाला आणि मागे पुढे नोंदणी झाल्याने मागाहून येणाऱ्यांची नावे पुढे आणि इतर नावे मागे गेल्याने लोण येथील शांताराम बाजीराव पाटील , जवखेडा येथील डी. जी. पाटील यांनी आधी आमची खरेदी करा म्हणून खरेदी थांबवली होती. त्यात चार दिवस वाया गेले. शेतकरी आणि वाहने खोळंबली होती. वाद मिटायला तयार नव्हता. जिल्हा मार्केटिंग अधिकारी सुनील मेने यांनीही भेट दिली आणि त्यांच्या निदर्शनास आले, की नोंदणी करण्यात घोटाळा झाला आहे. म्हणून त्यांनी २ हजार क्विंटलचे उद्दिष्ट वाढवून देण्याचे आश्वासन दिले होते. अखेर पोलिसांच्या मदतीने ज्याला क्रमाने ऑनलाईन संदेश देण्यात आले त्यांना प्राधान्य देऊन खरेदी सुरू करण्यात आली. पहिल्याच दिवशी ४८५ क्रमांकांपर्यंत खरेदी झाली.

> ज्वारी खरेदी सुरू करण्यात आली आहे. मात्र, नोंदणीत झालेल्या घोटाळ्याची चौकशी करून संबंधित कर्मचाऱ्याला निलंबित करण्यात येईल. उद्दिष्ट वाढविण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे.
>
> **– भागवत पाटील, चेअरमन, फ्रुटसेल सोसायटी, अमळनेर.**

# झोपताना २ बदाम 'या' गोष्टीसोबत खाल्ल्याने नजर होईल तीक्ष्ण?

## डॉक्टरांनी सांगितले डोळ्यांसाठी ५ महत्त्वाचे नियम


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

डोळ्यांची दृष्टी चांगली राहावी, यासाठी आहारात काही पोषक पदार्थांचा समावेश करण्याचा सल्ला दिला जातो. झोपण्यापूर्वी दोन बदामांसोबत नेमकी कोणती गोष्ट खाण्याचा दावा केला जातो आणि डोळ्यांच्या आरोग्यासाठी डॉक्टरांनी कोणते ५ नियम सांगितले आहेत, जाणून घ्या.

डोळ्यांचे आरोग्य चांगले राहावे आणि दृष्टी कमजोर होऊ नये, यासाठी आपण अनेक घरगुती उपाय ऐकत असतो. त्यापैकी काही उपाय आहारातील पोषक घटकांवर आधारित असतात, तर काही उपायांना कोणताही ठोस वैज्ञानिक आधार नसतो. सध्या समाजमाध्यमांवर असाच एक उपाय चर्चेत आहे. झोपण्यापूर्वी दोन बदाम एका विशिष्ट पदार्थासोबत खाल्ल्याने दृष्टी सुधारते, असा दावा केला जात आहे.

हा उपाय पाहिल्यानंतर अनेकांच्या मनात सहाजिकच प्रश्न निर्माण होतो, खरंच हा साधा आहार डोळ्यांची दृष्टी सुधारू शकतो का? की हा केवळ समाजमाध्यमांवर फिरणारा आणखी एक आरोग्यविषयक दावा आहे?

दिल्लीतील आय केअर सेंटरचे संचालक आणि ज्येष्ठ नेत्रतज्ज्ञ डॉ. संजीव गुप्ता यांनी या दाव्याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. त्यांच्या मते बदाम आणि संबंधित पदार्थ या दोन्हींमध्ये डोळ्यांच्या आरोग्यासाठी उपयुक्त पोषक घटक असले, तरी हे पदार्थ एकत्र खाल्ल्याने दृष्टी लक्षणीयरीत्या सुधारते असे सांगण्यासाठी पुरेसे वैज्ञानिक पुरावे उपलब्ध नाहीत.



### डोळ्यांसाठी बदाम फायदेशीर का मानले जातात?

बदामामध्ये 'ई' जीवनसत्त्व मुबलक प्रमाणात आढळते. हे जीवनसत्त्व प्रतिऑक्सिडीकारक म्हणून काम करते आणि शरीरातील पेशींना ऑक्सिडेटिव्ह ताणापासून संरक्षण देण्यास मदत करू शकते. याशिवाय बदामामध्ये ओमेगा-३ स्निग्ध आम्लेही आढळतात. डोळ्यांच्या पेशींच्या रचनेला आणि एकूण डोळ्यांच्या आरोग्याला ही पोषक तत्त्वे हातभार लावू शकतात. मात्र, केवळ बदाम खाल्ल्याने चष्म्याचा नंबर कमी होईल किंवा दृष्टी पूर्वीपेक्षा अधिक तीक्ष्ण होईल, असे समजणे योग्य नाही.

### 'अ' जीवनसत्त्वाचीही महत्त्वाची भूमिका

डोळ्यांच्या आरोग्यासाठी 'अ' जीवनसत्त्व अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. डोळ्यांच्या पडद्याचे आरोग्य टिकवून ठेवण्यास आणि कमी प्रकाशात पाहण्याच्या क्षमतेला आधार देण्यामध्ये त्याची भूमिका असते. याच कारणामुळे संतुलित आहारात 'अ' जीवनसत्त्व आणि इतर आवश्यक पोषक घटकांचा समावेश असणे महत्त्वाचे आहे. डॉ. गुप्ता स्पष्ट करतात, की संतुलित आहारामध्ये बदाम आणि संबंधित पदार्थांचा समावेश केल्याने डोळ्यांच्या आरोग्याला आधार मिळू शकतो; मात्र दृष्टीच्या समस्यांवर हा हमखास उपचार नाही.

### मग समाजमाध्यमांवर नेमका दावा काय?

इन्स्टाग्रामवरील एका आरोग्यविषयक पानावर, झोपण्यापूर्वी दोन बदाम एक चमचा विशिष्ट बियांसोबत खाल्ल्यास काही दिवसांत चांगले परिणाम दिसू लागतील, असा दावा करण्यात आला होता. हा दावा पाहून अनेक जण हा उपाय आपल्या दैनंदिन आहारात समाविष्ट करण्याचा विचार करू शकतात. मात्र, डोळ्यांची दृष्टी सुधारण्याची प्रक्रिया इतकी साधी नाही. दृष्टीवर आनुवंशिकता, जीवनशैली, वय, एकूण आरोग्य आणि डोळ्यांची स्थिती अशा अनेक घटकांचा परिणाम होतो, त्यामुळे एखादा पदार्थ खाल्ल्याने लगेच दृष्टी सुधारेल असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही.

### डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी डॉक्टरांचे ५ नियम

गुरुग्राममधील नोबल आय केअरचे संचालक डॉ. दिग्विजय सिंह यांच्या मते, डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी केवळ एखाद्या पदार्थावर अवलंबून न राहता संपूर्ण जीवनशैलीकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**१) संतुलित आहार घ्या :** फळे, भाज्या आणि संपूर्ण धान्यांचा आहारात नियमित समावेश करा. शरीराला आवश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजे मिळणे डोळ्यांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे.

२) वजन नियंत्रणात ठेवा : निरोगी वजन राखणे हे एकूण आरोग्यासोबतच डोळ्यांच्या आरोग्यासाठीही महत्त्वाचे आहे.

**३) अतिनील किरणांपासून डोळ्यांचे संरक्षण करा :** उन्हात बाहेर पडताना योग्य प्रकारचे सूर्यचष्मे वापरल्याने डोळ्यांना हानिकारक अतिनील किरणांपासून संरक्षण मिळण्यास मदत होऊ शकते.

**४) धूम्रपान टाळा :** धूम्रपानाचा संपूर्ण शरीरावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे डोळ्यांच्या आरोग्यासाठीही धूम्रपानापासून दूर राहणे महत्त्वाचे आहे.

**५) नियमित नेत्रतपासणी करा :** दृष्टीमध्ये बदल जाणवत नसला तरी नियमित नेत्रतपासणी केल्याने डोळ्यांशी संबंधित समस्या लवकर लक्षात येऊ शकतात.

मग दोन बदामांसोबत नेमके काय खायचे?

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिंगबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिंगबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# ‘चौका-बर्तन ही तो करना है, पढ़-लिखकर क्या करोगी’, जिसे मिलते थे ताने, वही लड़की बनी ‘आयएएस’

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

‘मंजिलें उन्हीं को मिलती हैं, जिनके सपनों में जान होती है, पंखों से कुछ नहीं होता, हौसलों से उड़ान होती है।’ ये लाइनें श्वेता अग्रवाल पर बिल्कुल सटीक बैठती हैं। पश्चिम बंगाल के एक छोटे से कस्बे से निकलकर उन्होंने यूपीएससी जैसी कठिन परीक्षा क्रैक करना आसान नहीं था। वह एक ऐसे माहौल और समाज के बीच पली-बढ़ीं, जहां लड़कियों के लिए शिक्षा से ज्यादा घर के काम और शादी का महत्व दिया जाता था। श्वेता ने हर कदम पर चुनौतियों का सामना किया। जब समाज ने उनके सपनों का मजाक उड़ाया और पढ़ाई की बजाय चौका-बर्तन तक सीमित रहने की सलाह दी तो उन्होंने आगे बढ़ने की ठानी और आयएएस बनीं। उनकी सक्सेस स्टोरी उन सभी लड़कियों के लिए प्रेरणा है, जो बंदिशों को तोड़कर अपनी पहचान बनाना चाहती हैं।

**सक्सेस स्टोरी**

### पश्चिम बंगाल की हैं श्वेता अग्रवाल, रूढ़िवादी माहौल में संघर्ष भरी शुरुआत

श्वेता अग्रवाल का जन्म पश्चिम बंगाल के भद्रेश्वर के एक मारवाड़ी परिवार में हुआ था। वह जोश टॉक के वीडियो में अपनी जर्नी साझा करते हुए बताती हैं कि उनके यहां का माहौल रूढ़िवादी था। उनके घर में लड़कियों की शिक्षा को प्राथमिकता नहीं दी जाती थी और रिश्तेदारी का दबाव शादी के लिए बना रहता था। विपरीत परिस्थितियों के बाद भी श्वेता के माता-पिता ने उनका साथ दिया और उन्हें इंग्लिश मीडियम स्कूल में पढ़ाया।

### ग्रेजुएशन के दौरान मिला ताना- ‘चौका-बर्तन ही करना है, पढ़-लिखकर क्या करोगी’

शुरुआती पढ़ाई के बाद श्वेता ने सेंट जेवियर्स कॉलेज, कोलकाता में एडमिशन लिया। उनके परिवार मे पहली बार था कि कोई ग्रेजुएशन कर रहा था। उस दौरान भी उन्हें परिवार के कुछ लोगों और रिश्तेदारों के तानों का सामना करना पड़ा। उनसे कहा गया कि ‘पढ़-लिखकर क्या करोगी, अतं में तो चौका-बर्तन ही करना है।’ इस अपमान ने उन्हें तोड़ा नहीं बल्कि उनके अंदर एक अधिकारी बनने की जिद पैदा कर दी थी।



### श्वेता ने पहले नौकरी की और फिर छोड़कर यूपीएससी की तैयारी

कॉलेज के बाद श्वेता ने एक कंपनी में नौकरी शुरू कर दी थी लेकिन उनका मन हमेशा सिविल सेवा में जाने का था। उन्होंने अपनी अच्छी-खासी नौकरी छोड़ दी और यूपीएससी की तैयारी में जुट गईं। शुरुआती दौर में उन्हें असफलताओं का सामना करना पड़ा और मानसिक तनाव भी हुआ। समाज के लोग उनकी शादी के लिए लगातार दबाव डाल रहे थे लेकिन श्वेता ने अपने सपनों को प्राथमिकता दी। उन्होंने मेहनत और अनुशासन को जारी रखा और खुद को बेहतर बनाया।

### पहले आयआरएस, फिर आयपीएस और २०१६ में यूपीएससी में रैंक १९ लाकर बनीं आयएएस

श्वेता का यूपीएससी का सफर प्रेरणादायक है। साल २०१४ में उन्होंने ४९७वीं रैंक के साथ आयआरएस का पद हासिल किया था। इसके बाद २०१५ में १४१वीं रैंक लाकर वह आयपीएस बन गईं लेकिन अभी तक उनका आयएएस बनने का सपना अधूरा था। यही वजह थी कि उन्होंने दोबारा पढ़ाई शुरू की और २०१६ के अपने प्रयास में उन्होंने ऑल इंडिया रैंक १९ हासिल करके न सिर्फ आयएएस बनने का सपना पूरा किया, बल्कि उस साल वेस्ट बंगाल की स्टेट टॉपर बनीं और पूरे एक दशक बाद बंगाल से किसी ने टॉप-२० में जगह बनाई थी।

### सफल आईएएस के रूप में पहचान, आज यहां है पोस्टिंग

आज श्वेता अग्रवाल एक सफलत आयएएस अधिकारी के तौर पर जानी जाती हैं। उनकी वर्तमान पोस्टिंग डीएम-कम-डीईओ (पूर्व बर्धमान), पश्चिम बंगाल है। उनकी यात्रा बताती है कि यदि इरादे पक्के हों तो सामाजिक तानों और छोटे कस्बे से निकलकर अपने सपने पूरे किए जा सकते हैं। उन्होंने न केवल रूढ़िवादी सोच को बदला, बल्कि ३ बार यूपीएससी क्रैक करके लाखों लोगों के लिए प्रेरणा बनीं।

# कोथिंबीर फ्रीजमध्ये ठेवली तरी सडते, पानेही पिवळी का होतात?

## मग ‘हे’ ४ सोपे उपाय करा; कोथिंबीर बराच काळ राहील हिरवीगार आणि सुगंधी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्वयंपाकघरात कोथिंबीर म्हणजे जणू प्रत्येक पदार्थाची शोभा वाढविणारा शेवटचा टच आमटी, भाजी, चटणी, कोशिंबीर, चाट किंवा आणखी काही. कोथिंबिरीमुळे पदार्थाला सुगंध आणि ताजेपणा मिळतो. त्यामुळे बाजारातून कोथिंबीरीची जुडी आणल्यानंतर ती फ्रीजमध्ये ठेवणे ही अनेकांची सवय आहे. पण काही दिवसांनी फ्रीज उघडला की चित्र वेगळेच दिसते. हिरवीगार कोथिंबीर काळपट, पिवळी, मऊ आणि चिकट झालेली असते. मग प्रश्न पडतो, फ्रीजमध्ये ठेवूनही कोथिंबीर खराब का होते? यामागे केवळ फ्रीजच कारणीभूत नसतो. अतिओलावा, पानांना झालेली इजा, ऑक्सिडेशन आणि सूक्ष्मजीवांची वाढ यामुळे कोथिंबीर लवकर खराब होऊ शकते.

**कोथिंबीर काळी का पडते?**

कोथिंबिरीची पाने अतिशय नाजूक असतात आणि त्यामध्ये पाण्याचे प्रमाणही जास्त असते. धुताना, कापताना, वाहतूक करताना किंवा फ्रीजमध्ये ठेवताना पानांना सूक्ष्म इजा झाली तर त्यांच्या पेशींमधील काही एन्झाइम्स आणि घटक एकमेकांच्या संपर्कात येतात. त्यामुळे ऑक्सिडेशन आणि एन्झायमॅटिक ब्राउनिंग होऊन पानांवर तपकिरी, राखाडी किंवा काळसर डाग दिसू लागतात. याशिवाय पानांमध्ये किंवा पानांमध्ये अडकलेला अतिओलावा परिस्थिती आणखी बिघडवतो. दमट वातावरणामुळे बॅक्टेरिया आणि बुरशीची वाढ होण्याची शक्यता वाढते. परिणामी पाने मऊ, चिकट आणि काळपट होऊ शकतात.

फ्रीजमध्ये खूप थंड भागात किंवा फ्रीझिंग एरियाच्या अगदी जवळ ठेवले तरी नाजूक पानांच्या पेशींना थंडीमुळे नुकसान होऊ शकते. त्यामुळे योग्य पद्धतीने साठवणूक करणे महत्त्वाचे आहे.

**कोथिंबीर जास्त दिवस ताजी ठेवण्यासाठी ४ सोपे उपाय**

* खराब पाने आधीच काढून टाका
* कोथिंबीर फ्रीजमध्ये ठेवण्यापूर्वी जुडी नीट साफ करा.
* पिवळी, वाळलेली, मऊ किंवा आधीच खराब झालेली पाने आणि नरम देठ काढून टाका. एक खराब झालेले पान आजूबाजूच्या पानांवरही परिणाम करू शकते. त्यामुळे संपूर्ण जुडी खराब होण्याचा वेग वाढू शकतो.
* साठवण्यापूर्वी कोथिंबीर धुऊन ठेवणे शक्यतो टाळा. धुतल्यास ती पूर्णपणे कोरडी करूनच साठवा.



**पेपर टॉवेलचा वापर करा**

कोथिंबीर हलक्या हाताने कोरड्या पेपर टॉवेलमध्ये गुंडाळा आणि त्यानंतर स्टोरेज बॅग किंवा कंटेनरमध्ये ठेवा. पेपर टॉवेल अतिरिक्त ओलावा शोषून घेण्यास मदत करतो. त्यामुळे पाने सतत ओलसर राहण्याची शक्यता कमी होते. पेपर टॉवेल ओला झाल्यास तो बदलून नवीन आणि कोरडा टॉवेल वापरा.

**हवाबंद कंटेनरमध्ये साठवा**

कोथिंबीर फ्रीजमध्ये ठेवताना योग्य आकाराच्या एअरटाइट कंटेनरचा वापर करता येतो. कंटेनरच्या तळाशी आणि वर पेपर टॉवेल ठेवला तर आत निर्माण होणारा अतिरिक्त ओलावा नियंत्रित करण्यास मदत होऊ शकते. यामुळे फ्रीजमधील इतर भाज्यांमुळे कोथिंबिरीची पाने दाबली जाण्याची शक्यताही कमी होते.

**देठ पाण्यात ठेवण्याचा उपाय**

कोथिंबीर ताजी ठेवण्यासाठी आणखी एक पद्धत म्हणजे देठ पाण्यात ठेवणे. कोथिंबिरीच्या देठाचा खालचा भाग थोडासा कापून जुडी एका ग्लास किंवा जारमध्ये थोड्या पाण्यात उभी ठेवा. त्यानंतर पानांवर स्वच्छ प्लास्टिकची पिशवी सैलसर झाकून ती फ्रीजमध्ये ठेवता येते. मात्र पाणी नियमित बदलणे आणि कुजलेली किंवा खराब झालेली पाने लगेच काढणे महत्त्वाचे आहे.

**लक्षात ठेवा ‘ही’ छोटीशी गोष्ट**

कोथिंबीर फ्रीजमध्ये ठेवली म्हणजे ती आपोआप जास्त दिवस ताजी राहील असे नाही. ओलावा आणि तापमानाचा योग्य समतोल राखणे महत्त्वाचे आहे. पानांवर पाणी साचू न देणे, खराब पाने काढून टाकणे आणि कोथिंबिरीला चिरडले जाणार नाही याची काळजी घेणे या छोट्या गोष्टी तिचा ताजेपणा टिकविण्यास मदत करू शकतात. फ्रीजमध्ये कोथिंबीर ठेवताना ‘जास्त पाणी म्हणजे जास्त ताजेपणा’ हा गैरसमज टाळा. योग्य साठवणूक केली तर तुमची हिरवीगार कोथिंबीर अधिक काळ सुगंधी आणि वापरण्यायोग्य राहण्यास मदत होऊ शकते.

# रोज ४ काजू खाल्ल्याने काय होते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

काजूमध्ये असलेले असंतृप्त फॅट्स आणि इतर पोषक घटक संतुलित आहाराचा भाग म्हणून हृदयाच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.

**शरीराला ऊर्जा मिळते** : काजूमध्ये हेल्दी फॅट्स, प्रथिने आणि कॅलरी असतात. त्यामुळे मर्यादित प्रमाणात काजू खाल्ल्यास शरीराला ऊर्जा मिळण्यास मदत होते.

**हाडांसाठी उपयुक्त** : काजूमध्ये मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि कॉपर यांसारखी खनिजे असतात. ही पोषकद्रव्ये हाडांच्या आरोग्यासाठी महत्त्वाची आहेत.

**मेंदूच्या आरोग्याला आधार** : काजूमधील हेल्दी फॅट्स, मॅग्नेशियम आणि इतर पोषक घटक संतुलित आहाराचा भाग म्हणून मेंदूच्या सामान्य कार्याला आधार देतात..

**त्वचेसाठी फायदेशीर :** काजूमध्ये कॉपर आणि अँटीऑक्सिडंट घटक असतात. योग्य आहारासोबत यांचे सेवन त्वचेच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरू शकते.

**पचनासाठी मदत** : काजूमध्ये आहारातील फायबर असते. त्यामुळे योग्य प्रमाणात काजू खाल्ल्यास संतुलित आहारातून मिळणाऱ्या फायबरचे प्रमाण वाढण्यास मदत होते.

**वजन नियंत्रणासाठी उपयोगी :** काजूमध्ये कॅलरी जास्त असल्या तरी त्यातील फॅट्स आणि प्रथिने पोट भरल्याची भावना वाढवण्यास मदत करू शकतात. मात्र प्रमाणात सेवन करणे महत्त्वाचे आहे.



# दिवसभर फक्त फळे खाणे सुरक्षित आहे का?

## जाणून घ्या काय सांगते संशोधन!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिवसभर फक्त फळे खाण्याच्या आहाराला ‘फ्रूटारियन डाएट’ म्हणतात. सफरचंद, पेरू आणि स्ट्रॉबेरी यांसारख्या फळांमुळे शरीराला भरपूर फायबर मिळते, ज्यामुळे पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. संत्री आणि लिंबूवर्गीय फळांमधील व्हिटॅमिन ‘सी’ दातांचे आरोग्य आणि प्रतिकारशक्ती मजबूत ठेवण्यास मदत करते. केळी, टरबूज आणि आंब्यामध्ये असणारे पोटॅशियम शरीरातील पाण्याचे प्रमाण संतुलित राखून रक्तदाब नियंत्रणात ठेवते. केवळ फळे खाल्ल्याने शरीराला आवश्यक प्रथिने, कॅल्शियम, व्हिटॅमिन ‘बी’ आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स मुबलक प्रमाणात मिळत नाहीत.

प्रथिनांअभावी शरीर ‘सर्व्हयव्हल मोड’मध्ये जाते. ज्यामुळे मेटाबॉलिझम मंदावून सतत थकवा आणि ॲनिमियाचा त्रास होऊ शकतो. फळांमधील नैसर्गिक साखरेचे प्रमाण जास्त असल्याने मधुमेह, पीसीओएस आणि इन्सुलिन रेझिस्टन्स असलेल्यांसाठी हा डाएट धोकादायक ठरू शकतो.

आहारात केवळ फळे ठेवल्यास कॅल्शियमची तीव्र कमतरता भासू शकते, ज्यामुळे भविष्यात ‘ऑस्टियोपोरोसिस’सारख्या आजाराचा धोका वाढतो. ताटात निम्म्या भागात फळे आणि उर्वरित भागात सुकामेवा, बिया व प्रथिनांचे स्रोत ठेवून आहार संतुलित करता येतो.



# अपार्टमेंटमध्ये घर घ्यायचे? कोणत्या मजल्यावर फ्लॅट घेणे शुभ?

## घर खरेदीवेळी चार गोष्टी ठेवा डोक्यात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वास्तूनुसार फ्लॅटसाठी कोणता मजला शुभ मानला जातो? तळमजला, तसेच पहिला, दुसरा, तिसरा आणि त्यावरील मजल्यांशी संबंधित वास्तुविषयक मार्गदर्शक तत्त्वे आणि महत्त्वाच्या टिप्स जाणून घ्या.

* फ्लॅटचा मजला निवडताना वास्तुशास्त्रासोबत व्यावहारिक बाबींचाही विचार करा.
* दिशा, मुख्य प्रवेशद्वार आणि घराची रचना या वास्तुतील महत्त्वाच्या बाबी मानल्या जातात.
* घरात पुरेसा नैसर्गिक प्रकाश आणि हवा येते का, हे नक्की तपासा.
* घर खरेदी करणे ही केवळ एक गुंतवणूक नाही, तर ते आयुष्यातील सर्वांत मोठ्या स्वप्नांपैकी एक असते.

म्हणूनच फ्लॅट खरेदी करताना अनेक लोक वास्तुशास्त्राला प्राधान्य देतात. ज्याप्रमाणे घराची दिशा, मुख्य प्रवेशद्वार आणि खोल्यांची रचना यांना अत्यंत महत्त्व दिले जाते, त्याचप्रमाणे तो फ्लॅट कोणत्या मजल्यावर आहे, या गोष्टीलाही वास्तुशास्त्राच्या मान्यतेनुसार प्रत्येक मजल्यावर एक विशिष्ट ऊर्जा असते, जी घरातील वातावरण आणि तेथे राहणाऱ्या लोकांच्या जीवनावर प्रभाव टाकत असते. त्यामुळे जर तुम्ही नवीन फ्लॅट घेण्याचा विचार करत असाल, तर वास्तुशास्त्राच्या नियमानुसार तुमच्यासाठी कोणता मजला सर्वात शुभ मानला ठरेल हे जाणून घेणे फायदेशीर ठरेल.



### वास्तुशास्त्रामध्ये जमिनीच्या मजल्याच्या उंचीचे महत्त्व

वास्तुशास्त्र हे पृथ्वी, जल, अग्नी, वायू आणि आकाश या पाच तत्त्वांच्या समतोलावर आधारित आहे. इमारतीची उंची जसजशी वाढते, तसतसा या तत्त्वांचा प्रभाव बदलत जातो असे मानले जाते; म्हणूनच वेगवेगळ्या मजल्यांचा संबंध वेगवेगळ्या ऊर्जांशी जोडला गेला आहे.

**तळमजला (ग्राउंड फ्लोर) :** स्थिरता आणि मजबुतीचे प्रतीक वास्तूनुसार तळमजला हा पृथ्वी तत्त्वाच्या सर्वात जवळ असतो. तो स्थिरता, सुरक्षितता आणि भक्कम पाया यांचे प्रतीक मानला जातो. ज्यांना जीवनात समतोल आणि स्थैर्य हवे आहे, त्यांच्यासाठी हा मजला शुभ मानला जातो.

**पहिला ते तिसरा मजला :** सर्वात संतुलित पर्याय वास्तुशास्त्रानुसार पहिला, दुसरा आणि तिसरा मजला हे सर्वात शुभ मानले जातात. या मजल्यांवर पृथ्वी आणि जल या तत्त्वांचा उत्तम समतोल असल्याचे मानले जाते. यामुळे घरात सकारात्मक ऊर्जा, मानसिक शांतता आणि कौटुंबिक सौहार्द वाढीस लागते.

**चौथा मजला आणि त्यावरील मजले :** मोकळेपणा, पण समतोल राखणे आवश्यक

वरच्या मजल्यांवर हवा आणि आकाश या तत्त्वांचा प्रबळ प्रभाव असतो असे मानले जाते. अशा मजल्यांवर राहिल्याने मोकळेपणा, स्वतंत्र विचारसरणी आणि सकारात्मक दृष्टिकोन जोपासण्यास मदत होते. पृथ्वी तत्त्वाशी असलेला संपर्क कमी होत असल्याने घराच्या अंतर्गत सजावटीमध्ये नैसर्गिक रंग, लाकूड आणि मातीशी संबंधित घटकांचा समावेश करणे फायद्याचे ठरते.

### वास्तूनुसार सर्वांत वरचा मजला अशुभ मानला जातो?

वास्तुशास्त्रानुसार सर्वांत वरचा मजला पूर्णपणे अशुभ मानला जात नाही. जर फ्लॅटची दिशा, मुख्य प्रवेशद्वार आणि अंतर्गत रचना वास्तूच्या तत्त्वांशी सुसंगत असेल तर वरच्या मजल्यावरील फ्लॅटमधूनही शुभ फळे मिळू शकतात. अशा फ्लॅट्समध्ये नैसर्गिक प्रकाश आणि मोकळे वातावरण सकारात्मक ऊर्जा वाढवितात, असे मानले जाते.

वास्तूनुसार कोणत्या दिशेला दरवाजा असलेला फ्लॅट निवडावा?

**पूर्वाभिमुख फ्लॅट** : समृद्धी, आरोग्य आणि सकारात्मक ऊर्जेचे प्रतीक.

**पश्चिमाभिमुख फ्लॅट** : स्थिरता, मानसिक स्पष्टता आणि आर्थिक समतोल यांच्याशी संबंधित.

**उत्तर-मुखी फ्लॅट** : ही दिशा संपत्ती आणि संधींची मानली जाते.

**दक्षिण-मुखी फ्लॅट** : योग्य वास्तु-संतुलन असल्यास ही दिशा अनुकूल मानली जाते.

### मुख्य प्रवेशद्वार कोणत्या दिशेला असावे?

वास्तूनुसार फ्लॅटचे मुख्य प्रवेशद्वार पूर्व, उत्तर किंवा ईशान्य दिशेला असणे अत्यंत शुभ मानले जाते. तसेच मुख्य प्रवेशद्वार स्वच्छ, चांगला प्रकाश असलेले आणि अडथळ्यांपासून मुक्त असावे. कारण घरात सकारात्मक ऊर्जा प्रवेश करण्याचे ते मुख्य प्रवेशद्वार मानले जाते.

### वास्तूनुसार कोणत्या मजल्याची निवड करावी?

केवळ वास्तुशास्त्राच्या दृष्टीकोनातून विचार करता, पहिला, दुसरा आणि तिसरा मजला हे सर्वात संतुलित आणि शुभमानले जातात. हे मजले पृथ्वी आणि जल या तत्त्वांचा सुसंवाद दर्शवतात. यामुळे सुख, शांती आणि समृद्धीचे वातावरण निर्माण होते, अशी धारणा आहे. दरम्यान, तळमजला स्थिरतेसाठी योग्य मानला जातो, तर वरचे मजले मुक्त विचार आणि सकारात्मक दृष्टिकोनासाठी योग्य मानले जात असतात.






# श्रावणातील तिसरा शनिवार : महत्त्व आणि व्रतवैकल्ये

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात श्रावण महिन्याला सर्व महिन्यांचा राजा म्हटले जाते. या महिन्यात येणारा प्रत्येक वार कोणत्या ना कोणत्या देवतेला समर्पित असतो. श्रावणातील शनिवार हा विशेषतः 'श्रावणी शनिवार' किंवा 'व्यंकटेश शनिवार' म्हणून ओळखला जातो. या दिवशी भगवान विष्णूंच्या व्यंकटेश रूपाची उपासना करण्याची प्राचीन परंपरा आहे.

### तिसऱ्या शनिवारचे धार्मिक महत्त्व

श्रावण महिना जसा पुढे सरकतो, तशी भक्तीची आणि निसर्गाची अनुभूती अधिक दाट होत जाते. तिसऱ्या शनिवारी उपासनेची तीव्रता वाढते. या दिवशी ब्रह्मांडात सात्त्विक लहरींचे प्रमाण जास्त असते. असे मानले जाते, की या दिवशी केलेली पूजा आणि दानधर्म यामुळे घरातील दारिद्र्य नष्ट होऊन सुख-समृद्धी नांदते.

### भगवान व्यंकटेशाची उपासना

महाराष्ट्रात आणि दक्षिण भारतात श्रावणी शनिवारी भगवान व्यंकटेश (बालाजी) यांची विशेष पूजा केली जाते.

**अश्वत्थ (पिंपळ) पूजन :** या दिवशी पिंपळाच्या झाडाला जल अर्पण करून प्रदक्षिणा घातली जाते. पिंपळामध्ये त्रिदेवांचा वास असल्याने विष्णूकृपा प्राप्त होते.

**व्यंकटेश स्तोत्र पठण :** घरात सुख-शांती लाभण्यासाठी 'श्री व्यंकटेश स्तोत्राचे' मनोभावे पठण केले जाते.

**खिचडीचा नैवेद्य :** अनेक घरांमध्ये या दिवशी प्रामुख्याने तांदूळ, मूग डाळ आणि तूप घालून बनवलेल्या मऊ खिचडीचा नैवेद्य देवा दाखविला जातो आणि तोच महाप्रसाद म्हणून ग्रहण केला जातो.

### शनी दोष आणि मारुतीरायांची भक्ती

ज्या व्यक्तींच्या कुंडलीत शनीची साडेसाती किंवा शनी दोष असतो त्यांच्यासाठी श्रावणातील तिसरा शनिवार हा सुवर्णयोग असतो.

**शनिदेवाचे उपाय :** शनी महाराजांच्या कोपापासून वाचण्यासाठी शनिवारी काळे तीळ, मोहरीचे तेल आणि काळे कपडे दान केले जातात.

**हनुमान चालिसा पठण :** शनी देवांचे संकट टाळण्यासाठी हनुमानजी ही एकमेव देवता आहे. या दिवशी मारुतीरायांच्या मंदिरात जाऊन सिंदूर, रुईच्या पानांची माळ आणि तेल अर्पण करून 'हनुमान चालिसा' किंवा 'बजरंग बाण' म्हटल्याने सर्व संकटांचे निवारण होते.



# क्या आप जानते हैं?

## ४०० वर्ष पुरानी हनुमान जी की पूर्वमुखी प्रतिमा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्र के अचलपुर (बंदेलपुरा) स्थित राममठ में विराजमान हनुमान जी की यह ५ फुट ऊंची पूर्वमुखी प्रतिमा केवल एक विग्रह नहीं, बल्कि अटूट भक्ति का सजीव प्रमाण है।

### क्या खास है इस अलौकिक प्रतिमा में?

✻ छत्रपति शिवाजी महाराज के आदेश पर उनके शिष्य भीलाराम जी ने गाय के पवित्र गोबर से इसका निर्माण किया था।
✻ समर्थ गुरु रामदास जी महाराज ने स्वयं इस प्रतिमा की प्राण-प्रतिष्ठा की थी।
✻ पिछले ४०० वर्षों से लगातार जल और सिंदूर अर्पित किए जाने के बाद भी यह प्रतिमा पत्थर से भी ज्यादा मजबूत स्थिति में है।
आस्था और इतिहास के इस अद्भुत संगम को नमन!

श्रीकृष्ण का अलौकिक विराट रूप । कुरुक्षेत्र दर्शन

**पवित्र भूमि कुरुक्षेत्र :** श्रीकृष्ण के विराट रूप की सबसे प्रसिद्ध और भव्य मूर्ति हरियाणा के पवित्र 'ज्योतिसर तीर्थ' पर स्थापित है।

**गीता उपदेश स्थली :** यह वही पावन धाम है, जहाँ महाभारत युद्ध के समय भगवान श्रीकृष्ण ने अर्जुन को श्रीमद्भगवद्गीता का अमर उपदेश दिया था।

**दिव्य अवतारों का समागम :** इस भव्य मूर्ति में श्रीकृष्ण के मुख्य स्वरूप के साथ-साथ भगवान शिव, ब्रह्मा, नृसिंह, हनुमान, अग्नि देव और परशुराम जैसे कई दिव्य अवतारों के दर्शन होते हैं।

**शीश पर शेषनाग का छत्र :** प्रभु के शीश पर छत्र के रूप में स्वयं शेषनाग जी सुशोभित हैं, जो इस विग्रह को अत्यंत अलौकिक और तेजमय बनाते हैं।

### एक रात में निर्मित रहस्यमयी 'गोला मठ मंदिर'!

मध्य प्रदेश के मैहर में स्थित 'गोला मठ' महादेव का एक अति प्राचीन और अलौकिक धाम है। अपनी अद्भुत वास्तुकला और बारीक नक्काशी के लिए प्रसिद्ध यह मंदिर सावन के महीने में शिवभक्तों की अगाध आस्था का केंद्र बन जाता है।

### मंदिर से जुड़ी खास बातें

**पौराणिक मान्यता :** स्थानीय लोककथाओं के अनुसार, इस भव्य मंदिर का निर्माण स्वयं भगवान विश्वकर्मा ने मात्र एक रात में किया था।

**अद्भुत वास्तुकला :** पत्थरों पर उकेरी गई बारीक कारीगरी और अनोखी बनावट आज भी हर दर्शनार्थी को चकित कर देती है।

**दिव्य शिवलिंग व नंदी :** मंदिर के गर्भगृह में स्थापित प्राचीन शिवलिंग और मुख्य द्वार पर विराजे नंदी महाराज की प्रतिमा भक्तों का मन मोह लेती है।

**सावन में भक्ति का सैलाब :** सावन के विशेष रूप से हर सोमवार को यहाँ दर्शन और जलाभिषेक के लिए श्रद्धालुओं की लंबी कतारें लगती हैं।

अगर आप भी मैहर आ रहे हैं, तो माँ शारदा के दर्शन के साथ-साथ महादेव के इस रहस्यमयी और पवित्र धाम में माथा टेकना न भूलें!
हर हर महादेव!

# श्रावणी शनिवारीच का केली जाते अश्वत्थमारुतीची पूजा?

## पिंपळाच्या झाडाखाली दडले आहे 'हे' मोठे गूढ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रावण महिन्यात दर दिवशी विविध सण आणि व्रतांची मांदियाळी पाहायला मिळते. या पवित्र महिन्यात श्रावणी शनिवारी केले जाणारे 'अश्वत्थमारुती पूजन' अत्यंत विशेष आणि फळदायी मानले जाते. धार्मिक मान्यतेनुसार श्रावणातील शनिवारी पिंपळाच्या (अश्वत्थ) झाडाची आणि हनुमानजींची पूजा केल्याने सर्व प्रकारच्या संकटांतून व पीडांतून मुक्ती मिळते.

श्रावण महिन्यात येणाऱ्या प्रत्येक शनिवारी मारुती (हनुमान) आणि शनी देवांच्या पूजेला विशेष महत्त्व असते. या दिवशी केलेल्या उपायांनी कुंडलीतील शनीचे दोष कमी होतात आणि मारुतीरायांच्या कृपेने सर्व संकटांतून मुक्ती मिळते, अशी धार्मिक श्रद्धा आहे.

हिंदू धर्मात पिंपळाच्या झाडाला अत्यंत पूजनीय स्थान आहे. श्रीमद्भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णांनी "वृक्षांमध्ये मी अश्वत्थ आहे" असे म्हटले आहे. त्यामुळे पिंपळाची पूजा करणे म्हणजेच साक्षात भगवान विष्णूंची पूजा करण्यासारखे मानले जाते.



### कशी करावी पूजा?

दुग्धार्पण : श्रावणी शनिवारी दुधामध्ये बेलाचे पान घालून ते दूध पिंपळाच्या मुळाशी अर्पण केले जाते. यामुळे पिंपळाला विशेष सुगंध प्राप्त होतो आणि वातावरणात सकारात्मकता निर्माण होते.

**मारुतीरायांचे पूजन :** शनिवार हा मारुतीरायांचा वार मानला जातो. पिंपळाच्या खाली मारुतीरायांची मूर्ती असल्यास तिची किंवा स्वतंत्रपणे मारुतीरायांची पूजा केली जाते.

**मारुतीरायांना प्रसन्न** करण्यासाठी या दिवशी तेल, शेंदूर आणि रुईच्या पानांची माळ श्रद्धेने अर्पण करण्याची परंपरा आहे.

पिंपळ आणि मारुतीरायांची एकाच दिवशी पूजा केल्याने शनिदोषाचा प्रभाव कमी होतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे. श्रावणातील या दुसऱ्या शनिवारी अश्वत्थ मारुती पूजन केल्यास घरातील नकारात्मक ऊर्जा दूर होऊन सुख, शांती आणि समृद्धी लाभते, म्हणूनच या पूजनाला श्रावणात विशेष महत्त्व दिले जाते.

ज्योतिषशास्त्र आणि धार्मिक मान्यतेनुसार श्रावण महिन्यात शनी देवांचा प्रकोप शांत करणे आणि कुंडलीतील साडेसाती यांसारख्या दोषांचा प्रभाव कमी करणे अत्यंत सोपे मानले जाते. या दिवशी मारुतीरायांची पूजा केल्याने शनी देवांचा आशीर्वाद आपोआप प्राप्त होतो, अशी भाविकांची दृढ श्रद्धा आहे.

### दानाचे विशेष महत्त्व आणि पिंपळ पूजन

श्रावणी शनिवारी केवळ पूजा-अर्चाच नव्हे, तर दानालाही खूप महत्त्व दिले जाते. धार्मिक विधींनुसार या दिवशी काळे उडीद, काळे वस्त्र, लोखंडी वस्तू किंवा तेलाचे दान केल्याने आर्थिक अडचणी आणि मानसिक क्लेश दूर होतात. सायंकाळच्या वेळी अनेक भाविकांनी पिंपळाच्या झाडाखाली तेलाचा दिवा लावून पितृदोष आणि शनी दोषांच्या शांतीसाठी प्रार्थना केली.

# पुढील ४ महिने हवे ते मिळणार!

## राहू-केतूचे गोचर 'या' चार राशींच्या लोकांना करोडपती बनविणार, रातोरात होणार मालामाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



ज्योतिषशास्त्रात राहू-केतू या दोन्ही ग्रहांना मायावी ग्रह म्हटले जाते. हे दोन्ही ग्रह नेहमी उलटी चाल चालून ग्रह गोचर करतात. त्यांच्या या स्थितीला वक्री असे म्हटले जाते. हे ग्रह इतर ग्रहांप्रमाणेच आपले राशी परिवर्तन करतात. ज्यामुळे या ग्रहांच्या बदलाचा चांगला-वाईट परिणाम सर्व राशींवर होतो. या ग्रहांची एखाद्यावर शुभ दृष्टी असल्यास त्या व्यक्तीचे भाग्य उजळते. तसेच अशुभ दृष्टी असल्यास व्यक्तीला आयुष्यात अनेक संकटांचा सामना करावा लागू शकतो. सध्या राहू कुंभ राशीत केतू सिंह राशीत गोचर करत असून राहू धनिष्ठा नक्षत्रात आणि केतू मघा नक्षत्रात आहे. दरम्यान, डिसेंबरमध्ये राहू-केतू राशी आणि नक्षत्र परिवर्तन करणार आहेत. ज्याचा प्रभाव १२ पैकी काही राशींच्या लोकांवर होईल.

### राहू-केतूचे गोचर भाग्य बदलणार



**मेष :** राहू-केतूचे गोचर मेष राशीच्या व्यक्तींसाठी खूप शुभ परिणाम देणारा असेल. या काळात तुमच्या मनातील अनेक इच्छा पूर्ण होतील. आयुष्यातील ध्येय साध्य करण्यासाठी खूप कष्ट घ्याल. कुटुंबात आनंदाचे वातावरण असेल. वैवाहिक जीवन सुखमय राहील. या काळात खूप सकारात्मक विचार कराल. आयुष्यातील नवे बदल स्वीकारण्यास तयार व्हा.



**सिंह :** या राशीच्या व्यक्तींसाठी हा काळ अनेक आनंदी वार्ता घेऊन येईल. करिअर, व्यवसायात चांगली प्रगती होईल. मुलांकडून आनंदी वार्ता कानी पडतील. भाग्याची भरपूर साथ मिळेल. आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलेल. स्पर्धा परीक्षेची तयार करणाऱ्यांनाही यशाचे फळ लाभेल. सगळीकडे चुमचे वर्चस्व असेल. फक्त मेहनत कायम ठेवा. अविवाहितांसाठी लग्नाचे अनेक प्रस्ताव येतील.



**धनू :** वृश्चिक राशीच्या व्यक्तींसाठी या काळात अनेक लाभकारी परिणाम पाहायला मिळतील. या काळात कुटुंबातील वाद मिटतील. नव्या वस्तू खरेदी करू शकाल. कामच्या ठिकाणी सहकार्यांची मदत मिळेल. तीर्थक्षेत्रांना भेट द्याल. नवीन वाहन, प्रॉपर्टी विकत घेऊ शकता. अडकलेले पैसे परत मिळतील. नोकरी-व्यवसायात पदोन्नती होईल. आकस्मिक धनलाभ होईल. कुटुंबातील जुने वाद मिटतील, आनंदाचे वातावरण असेल.



**तूळ :** राहू-केतूचे गोचर तूळ राशीच्या व्यक्तींच्या आयुष्यात आनंदी आनंद येईल. मनातील सर्व इच्छा पूर्ण होतील. या काळात तुमची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल. जोडीदाराची साथ मिळेल. प्रत्येक क्षेत्रात यश मिळवाल. या काळात तुमच्या आत्मविश्वासात वाढ होईल. समाजात तुमच्या कामाचे कौतुक होईल आणि कुटुंबात सुख-शांतीचे वातावरण असेल. नोकरीच्या शोधात असणाऱ्यांना नोकरी मिळेल. समाजात मान-सन्मान, यश-कीर्ती वाढेल.

# श्रावणात शनी देवांचा चमत्कार!

## 'या' ३ राशींना लाभणार राजेशाही सुख आणि अपार पैसा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्योतिषशास्त्रात शनी देवांना न्यायाची देवता आणि कर्मफलदाता मानले जाते. माणसाच्या चांगल्या-वाईट कर्मांचा अगदी अचूक हिशेब शनी देव ठेवत असतात. म्हणूनच जेव्हा जेव्हा शनी देव आपल्या चालीमध्ये किंवा राशीमध्ये बदल करतात तेव्हा त्यांचा थेट आणि मोठा प्रभाव मानवी जीवनावर पडतो.

यंदाचा पवित्र श्रावण महिना काही राशींच्या लोकांसाठी अत्यंत भाग्याचा आणि नशिबाला कलाटणी देणारा आहे. श्रावण महिना हा देवाधिदेव महादेवांचा अत्यंत प्रिय महिना आहे आणि याच पवित्र महिन्यात शनी देव आपली चाल बदलतील. जे लोक नेहमी न्यायाच्या आणि सत्याच्या मार्गाने चालतात त्यांच्यावर शनी देवांचा वरदहस्त असतो. या श्रावणात शनीदेवांच्या वक्री चालीमुळे काही राशींच्या आयुष्यात यशाचा एक नवीन सूर्योदय होईल.

### कधी बदलणार शनीची चाल?

ज्योतिषशास्त्रानुसार श्रावणात सुरू झालेली शनी देवांची ही वक्री चाल ११ डिसेंबर २०२६ पर्यंत असणार आहे. शनी देव वक्री अवस्थेत असतात तेव्हा त्यांचा प्रभाव आणि शक्ती अनेक पटींनी वाढते. ही वेळ माणसाला स्वतःच्या जुन्या कर्मांचे आत्मपरीक्षण करण्याची संधी देते. श्रावण महिन्यात हा बदल होत असल्याने भक्तांना एकाच वेळी महादेव आणि शनी देव या दोघांचाही संयुक्त आशीर्वाद मिळण्याची सुवर्णसंधी निर्माण झाली आहे.

**वृषभ :** अडकलेला पैसा परत मिळणार, प्रगतीचे मार्ग मोकळे

शनी देवांच्या या वक्री चालीमुळे वृषभ राशीच्या लोकांच्या आयुष्यात सुवर्णकाळाची सुरूवात होणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून ज्या अडचणींचा तुम्ही सामना करत होतात त्या आता संपतील.

**नोकरी-व्यवसाय :** ऑफिसमध्ये तुमची पदोन्नती होण्याची दाट शक्यता आहे. वरिष्ठांकडून तुमच्या कामाचे कौतुक होईल आणि कष्टाचे योग्य फळ मिळेल.

**आर्थिक लाभ :** उत्पन्नाचे नवीन स्त्रोत निर्माण होतील. ज्यामुळे आर्थिक बाजू मजबूत होईल. जर तुमचे पैसे कुठे अडकले असतील, तर ते या काळात अनपेक्षितपणे परत मिळतील.

**व्यापार :** व्यापाऱ्यांना नफा देणारे मोठे व्यवहार मिळतील. ज्यामुळे भविष्यातील चिंता मिटेल.

**कर्क :** पित्रोपार्जित संपत्तीचे वाद मिटणार, घरात सुख-शांती!

कर्क राशीच्या लोकांसाठी हा काळ अद्भुत यश आणि नशीब घेऊन येत आहे. शनी देव जणू या राशीच्या लोकांसाठी यशाची गुरुकिल्ली ठरणार आहेत.



**गुंतवणूक :** तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करण्याचा किंवा मोठी गुंतवणूक करण्याचा विचार करत असाल, तर हा काळ अतिशय उत्तम आहे. या काळात केलेल्या गुंतवणुकीतून भविष्यात प्रचंड नफा मिळेल.

**कौटुंबिक जीवन :** कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील. वडिलोपार्जित संपत्तीवरून सुरू असलेले जुने कोर्ट-कचेरीचे वाद मिटतील. मान-सन्मानात मोठी वाढ होईल.

### वृश्चिक : निर्माण होणार 'राजयोग', विद्यार्थ्यांसाठी सुवर्णकाळ!

शनीच्या या परिवर्तनाचा सर्वाधिक फायदा वृश्चिक राशीच्या जातकांना होणार आहे. ज्योतिषशास्त्रानुसार शनी देव या राशीच्या लोकांसाठी विशेष 'राजयोग' तयार करीत आहेत.

**आर्थिक बदल :** तुमची आर्थिक स्थिती इतकी सुधारेल की तुम्ही स्वतः थक्क व्हाल. नोकरदार वर्गावर नवीन आणि मोठी जबाबदारी सोपविली जाऊ शकते. ज्यामुळे करिअरला नवी उंची मिळेल.

**विद्यार्थी वर्ग :** स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा काळ अत्यंत शुभ आहे. अभ्यासात लक्ष केंद्रित होईल आणि परीक्षेत अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळून स्वप्न पूर्ण होतील. वृश्चिक राशीसाठी हा काळ एखाद्या सुवर्णयुगासारखा असेल.

### शनी देवांना प्रसन्न करण्याचे सोपे उपाय

शनी देव हे कर्माचे देव आहेत. त्यामुळे त्यांना प्रसन्न ठेवण्याचा सर्वांत सोपा मार्ग म्हणजे नेहमी प्रामाणिक राहणे. तसेच या श्रावण महिन्यात काही उपाय केल्यास शनी देव अत्यंत प्रसन्न होतात. रोज सकाळी स्नान करून महादेवांची आणि शनी देवांची मनोभावे पूजा करावी. गरीब, गरजू आणि अपंग लोकांना शक्य ती मदत करावी. त्यांना अन्नदान करावे. पशू-पक्ष्यांना अन्न आणि पाणी द्यावे. शनिवारी शनी मंदिरात जाऊन मोहरीच्या तेलाचा दिवा लावावा.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)